वंशावळी आणि वृत्तांत : घराणे

## घराणे १५ वे,

१ रामाजी

२ हरि

३ रामाजी — अंताजी (पृ.११२) — बाळजी

४ भास्कर — हरि — सदाशिव(पृ.११२) — गणेश

५ पांडुरंग — कृष्णाजी — विठल — रामचंद्र — नारायण — गोविंद

६ { दत्तात्रय, दिनकर — प्रभाकर २, दामोदर १ — शंकर, वामन — विनायक — यशवंत, विष्णु — रावजी

७ { *भास्कर — *बाळकृष्ण — *लक्ष्मण — *शिवराम, *हरि — *जगन्नाथ २, *राजाराम १ — रामचंद्र — *गणेश — *परशुराम — मोरेश्वर, *गजानन

८ { *चंद्रकांत २, *सुभाष ३, *रामकृष्ण १ — *प्रकाश — *मोहन — *अरविंद — *आनंद — *शंकर, *अंकुश, *मनोहर — *श्रीहरि, *अनिल — *हेमंत, *राजेंद्र

९ { *मंदार — *अभिषेक — *सुमुख — *प्रियरंजन — *महेश


खुडीपाट, डोंबिवली — दहीबाव — सावंतवाडी, कराड — कराड — सांगली — खुडीपाट, गोवा — मुंबई, खुडीपाट — मुंबई, पुणे, अमेरिका — खुडी — डोंबिवली

## हिंदळे - खुडीपाट पृ.११०-१२१ब


१

३

४



| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रामाजी | | | | | | | | | |
| २ | हरि | | | | | | | | | |
| ३ | रामाजी(बाबाजी) | | | | | | | अंताजी (पृ.११२) | | |
| ४ | हरि | | | | सदाशिव(पृ.११०) | | | शिवराम | | |
| ५ | गापोळ | | | अनंत | केशव | वासुदेव | | प्रभाकर<br>(भलंभट) | जगन्नाथ | बळवंत |
| ६ | * रामचंद्र | | | सदाशिव<br>लक्ष्मण | श्रीराम | | | अनंत | | हरि |
| ७ | * दिनेश<br>(पृ.१११) | * प्रकाश | * कमलेश | विनायक<br>दत्तात्रय | जनार्दन<br>* पुरुषोत्तम | * मधुकर | * गोपाळ | शिवराम | लक्ष्मण<br>*गणेश | * दामोदर |
| ८ | * समीर | * नीरज | * राजेश<br>* निलेश | | * शरद<br>* प्रदीप | * संतोष | * रमेश<br>* संजय<br>* विजय | * उदय | * अरविंद<br>* सुरेश<br>* शरद | * प्रभाकर |
| ९ | | | | | आदित्य | रोहन | | | | * निरंजन |
| | सांगली<br>कोल्हापूर | पुणे | हातकणंगले | | दहिबाव | वालचंदनगर | खुडीपाट | मुंबई | मुंबई | मुंबई |


१
२
३
लक्ष्मण
मोरेश्वर
४
मोरेश्वर
५
श्रीधर
यशवंत
* अच्युत
* शंकर
अनंत
}६
* जगन्नाथ
मोरेश्वर
* विष्णु
विठ्ठल
* सदाशिव
* गजानन
* सतीश
* उदय
}७
* माधव
* अमेय
}८
}९
पुणे
पुणे
अमेरिका
ठाणे
कोल्हापूर
रत्नागिरी

## घराणी १५ वे, हिंदळे - खुडीपाट

या घराण्याचा मूळ गांव हिंदळे. हा गांव देवगडापासून १० मैल आहे. १९४६ मध्ये लोकसंख्या २७००. ब्राह्मणाची घरे १८ होती. मुख्य देवस्थान श्रीकाळभैरव, विश्वेश्वर व कार्तिक स्वामी. हिंदळे येथून ही मडंळी खुडीपाट येथे जाऊन स्थायिक झाली. खुडीपाट ही कोटकामते गावांची वाडी आहे. खुडीपाट येथील मुख्य देवता भगवती हेदूदेवी. या देवस्थानास कोटकामते हा गांव इनाम आहे. काळभैरव, विश्वेश्वर, रामेश्वर (हिंदळे), महालक्ष्मी यांना नैवेद्य दाखवितात.

**(वंशावळ पृ. ११०)**

**हरि रामाजी (२)** प्रथम १०/१२ वर्षे अंजनवेलीस होते. पुढे हिंदळे येथील वतन जमीन सोडविली. तेथे नवीन घर व विहीर बांधिली. हिंदळे येथे गृहस्थी बाण्याने राहिले.

**बाबजी (रामाजी) हरि (३)** हिंदळे येथून कोटकामते गावाची वाडी खुडीपाट, येथे जाऊन स्थायिक झाले. पेशवाईत खारेपाटण व कोटकामते येथे सरसुभे होते. पेशवाई बुडाल्यावर इंग्रजांची नोकरी करावयाची नाही म्हणून यांनी राजीनामा दिला. यांच्या इच्छेनुसार यांच्या घराण्यांत नंतर कोणीही सरकारी नोकरी केली नाही. पत्नी उमा, पिता लेले, हिंदळे. कन्या (१) आऊ, पती महादेव गोविंद जोशी, आचरे. (२) येसू, पती काळे, राजापूर. (३) गोदू, पती गोडक, त्रिंबक. (४) अंबू.

**भास्कर बाबजी (४)** मृत्यु ८२ व्या वर्षी. खुडीपाट येथे शेती बागायती करीत. पत्नी सरस्वती, पिता अभ्यंकर, नारिंग्रे. कन्या (१) काशी, पती विष्णुपंत अभ्यंकर, हिंदळे. (२) द्वारकी, त्रिंबक येथे दिली.

**पांडुरंग भास्कर (५)** मृ. श. १८३९. वय ७५. खुडीपाट येथे शेती करीत. पत्नी उमा, पिता कृष्णाजी भास्कर नातू. आंबेरी. कन्या (१) गुणा, पती विनायक परशुराम बापट, नारिंग्रे. (२) आऊ, पती दिनकर केशव खाडिलकर, मिठबाव.

**दत्तात्रेय पांडुरंग (६)** ज. श. १८००. प्रथम मुंबईस खासगी नोकरी. पुढे खुडीपाट येथे शेती केली. नंतर देवगड येथे राहात पत्नी सरस्वती, पिता गणेश विष्णु सोहनी, हिंदळे. कन्या (१) येसू, पती परशुराम लक्ष्मण खाडिलकर, मसुरे. (२) विठाबाई, पती शिवराम लक्ष्मण डोंगरे, मसदे. (३)अंबू, पती दत्तात्रेय गोविंद जोशी, दाभोळ. (४) यमू, पती विठ्ठल गणेश केळकर, नाडण. (५) कृष्णाबाई, पती विष्णु रावजी डोंगरे, मालवण. (६) अनसुया, पती दत्तात्रेय महादेव नेने, वाडे.

**दिनकर पांडुरंग (६)** ज. श. १८०८. मृ. स. १९५३. फोंडा येथे खासगी नोकरी १५ वर्षे केली. नंतर खुडीपाट येथे शेती. पत्नी नर्मदा, पिता श्रीधर गंगाधर बापट, नारिंग्रे. कन्या सखू, पती अनंत गणेश गोगटे, इळये.

*** भास्कर दिनकर (७)** ज. स. १९२२, प्रथम मुंबईस गोदीत नोकरी. नंतर १९५३ मध्ये रत्नागिरी कॉलेजमधून फुल ट्रेंड झाले. प्राथमिक शिक्षण म्हणून निवृत्त. सध्या शेती करतात. वास्तव्य खुडी, ता. देवगड. प्रासंगिक छोटी नाटके लिहिली. गरिबांना शक्य ती मदत. पत्नी इंदिरा, पिता आबाजी भास्कर खाडिलकर, खेरवंद (सिंधुदुर्ग). कन्या (१) प्रेमलता, एस्. एस्. सी. पती शशिकांत आत्माराम गानू, वाशी (रत्नागिरी). (२) छाया.

*** रामकृष्ण भास्कर (८)** ज. स. १९४७, एस्. एस्. सी. मुंबईमध्ये एस्. एच्. केळकर कंपनीत क्लार्क. वास्तव्य डोंबिवली. पत्नी स्मिता, एस्. एस्. सी., डी.एड्., पिता जगन्नाथ हरी शेंबवणेकर, शेंबवणे (रत्नागिरी). कन्या पूनम, ज. स. १९८५.

*** मंदार रामकृष्ण (९)** ज. स. १९८०. प्राथमिक विद्यार्थी.

*** चंद्रकांत भास्कर (८)** ज. स.१९५४. एस्. एस्. सी.

*** सुभाष भास्कर (८)** ज. स.१९५८.

*** बाळकृष्ण दिनकर (७)** ज.स.१९३१. दहिबाव (सिंधुदुर्ग) येथे ट्रेंड प्राथमिक शिक्षक. पत्नी पुष्पा, पिता वासुदेव दिनकर दामले, विजयदुर्ग (सिंधुदुर्ग). कन्या (१) रजनी, एस्. एस्. सी., डी. एड्., पती वासुदेव सखाराम लिंगनूरकर,

कोल्हापूर. (२) संध्या, कॉलेज विद्यार्थिनी.
*** प्रकाश बाळकृष्ण (८)** ज.स.१९६०. बी. ए., बी. एड्., माध्यमिक शिक्षक. नाट्य व पेटी - तबला वादन.

*** लक्ष्मण दिनकर (७)** ज.स.१९३४. सावंतवाडी येथील सरकारी हॉस्पिटलमध्ये नोकरी. पत्नी विजया, पिता दिवाकर नारायण अभ्यंकर, मालवण.

*** मोहन लक्ष्मण (८)** ज.स.१९६०. एस्. एस्. सी., लॅबोरेटरी असिस्टंटची नोकरी, कराड. पत्नी वनिता, एस्. एस्. सी. पिता हरि सदाशिव बर्वे, बाळ्ळी (गोवा).

कु.वृ.पृ. ११४ अखेर

कु.वृ.पृ. ११५ सुरुवात

*** अभिषेक मोहन (९)** ज. स.१९८३.

*** अरविंद (रतन) लक्ष्मण (८)** ज. स. १९६२. एस्. एस्. सी., कराड येथील धन्वंतरी हॉस्पिटलमध्ये कपौंडर. समाजसेवेची आवड. पत्नी उषा, पिता बंगारेश्वर सुबराय हेगडे, सिद्धापूर (कर्नाटक).

*** सुमुख अरविंद (९)** ज. स. १९८८.

**कृष्णाजी भास्कर (५)** ज. श. १७६७, मृ. श. १८४३. खुडीपाट येथे शेती करीत. पत्नी राधा, पिता केळकर, आंबेरी.

**दामोदर कृष्णाजी (६)** मृ. श. १८५६. वय ४८ खुडीपाट येथे शेती करीत. पत्नी मथुरा, पिता गणेश परशुराम लेले, मिठबाव. कन्या आऊ व ताई.

*** शिवराम दामोदर (७)** ज. श. १८४४. सांगलीस खाजगी नोकरी. सध्याची माहिती मिळाली नाही.

*** हरि दामोदर (७)** ज. श. १८४८. सांगलीस डॉ. परांजपे यांचेकडे कंपौंडर. सध्याची माहिती मिळाली नाही.
**प्रभाकर कृष्णाजी (६)** मृत्यु ३२ व्या वर्षी. खुडीपाट येथे शेती करीत. पत्नी यशोदा, पिता नारायणभटजी तुळपुळे, आडवली.

**विठ्ठल भास्कर (५)** मृत्यु ४० व्या वर्षी. खुडीपाट येथे शेती करीत. पत्नी भागीरथी, पिता विश्वनाथपंत आपटे, त्रिंबक. कन्या (१) काशी, पती प्रभाकरपंत खाडिलकर, मसुरे. (२) मनू, पती विनायकराव काणे, गोळवण.

**शंकर विठ्ठल (६)** ज. श. १८१४, मृ. श. १८६६. अविवाहित.

**वामन विठ्ठल (६)** ज. श. १८१६, मृ. श. १९५२. खुडीपाट येथे शेती करीत. पत्नी लक्ष्मी, पिता प्रभाकर वासुदेव सोमण, मिठबाव.

*** राजाराम वामन (७)** ज. स. १९२५. एस्. एस्. सी. सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक. वास्तव्य गोवा. पत्नी जानकी, पिता रावजी डोंगरे, पेंडूर (सिंधुदुर्ग). कन्या आशालता, कॉलेज विद्यार्थिनी.

*** आनंद राजाराम (८)** ज. स. १९५६. एम्. कॉम., एल्.एल्. बी., सी.ए.आय.आय.बी. गोवा येथे सिंडिकेट बँकेत कारकून. पणजी येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ वर्क्समध्ये अकौंटन्सी विषयाचे अध्यापन. पत्नी अनुराधा, पिता रामकृष्ण पेंडसे, आवळेगांव.

*** प्रियरंजन आनंद (९)** ज. स. १९८४.

*** जगन्नाथ वामन (७)** ज. स. १९३३. खुडीपाट येथे शेती करतात. अविवाहित.

**हरि बाबजी (४)** मृत्यु ७० व्या वर्षी. खुडीपाट येथे शेती करीत. पत्नी अन्नपूर्णा, पिता शेवडे - आपटे, आडवली.

**रामचंद्र हरि (५)** मृत्यु ५० व्या वर्षी. खुडीपाट येथे शेती करीत. पत्नी जानकी, पिता कृष्णंभटजी खाडिलकर, मिठबाव. कन्या (१) भिमी, पती यशवंत हरि नातू, चिंदर. (२) गंगू, पती नारायण रघुनाथ डोंगरे, मसदें.

**विनायक रामचंद्र (६)** ज. श. १७९७, मृ. श. १८६५. खुडीपाट येथे शेती करीत. पत्नी आनंदी (दुर्गाबाई). यांनी

स्वकतृत्वाने मुंबईस गिरगावात सुग्रास भोजनालय व गृहवस्तु भांडार चालू केले. पिता रामचंद्र गुणाजी बापट, हिंदळे. कन्या (१) गोदू, पती काशीनाथ भास्कर केळकर, दाभोळे. (२) लाडूबाई, पती श्रीराम पद्माकर बापट, यवतमाळ. (३) काशी, पती विष्णु विनायक गोगटे, मिठबाव.

**रामचंद्र विनायक (७)** ज. श. १८३३. मृ. स. १९४४, मुंबईस गिरगावातील सुग्रास भोजनालय व गृहवस्तुभांडाराशी संबंधित खुडीपाट येथे शेती करीत. वास्तव्य खुडीपाट. पत्नी रुक्मिणी, पिता गणेश वासुदेव नातू, आचरे.

* **शंकर रामचंद्र (८)** ज. स. १९३४. मुंबईत बी. ई. एस. टी. मध्ये नोकरी. अविवाहित.

* **अंकुश रामचंद्र (८)** ज. स. १९३७. खुडीपाट येथे शेती करतात. अविवाहित.

* **मनोहर रामचंद्र (८)** ज. स. १९३९. खुडीपाट येथे शेती करतात. पत्नी मीरा, पिता नारायण विष्णु महाबळ, कोनशी (सिंधुदुर्ग).

* **महेश मनोहर (९)** ज. स. १९७९. विद्यार्थी.

कु.वृ.पृ. ११५ अखेर कु.वृ.पृ. ११६ सुरुवात

* **गणेश विनायक (७)** ज. स. १९२१. चार्टर्ड अकौंटंट. मॉस्कोमध्ये राहून रशियन भाषेचा अध्यापन डिप्लोमा मिळविला. सध्या निवृत्तीनंतर मुंबईला रशियन भाषेचे वर्ग घेतात. प्रथम किलिक निक्सन कंपनीमध्ये शिपिंग डिपार्टमेंटमध्ये नोकरी. नंतर मुंबईच्या आय्. आय्. टी. मध्ये रशियन भाषेचे प्राध्यापक. पत्नी मालिनी, वयाच्या ३६ व्या वर्षी पुन्हा शिक्षण चालू करून हॉटेल मॅनेजमेंट व केटरिंग टेक्नॉलॉजीचा डिप्लोमा मिळविला. शेवटच्या परीक्षेत कुकरी विषयात प्रथम क्रमांक व पारितोषिक. १ वर्ष मुंबईच्या हॉटेल नटराजमध्ये नोकरी. नंतर केटरिंग कॉलेजमध्ये प्राध्यापिका. पिता दामोदर हरी गोखले, मिरज.
कन्या नीला, मुंबई विश्वविद्यालयातून १९६९ मध्ये बी.एस्सी. प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण. नंतर अमेरिकेमध्ये एम्. एस्. व पीएच्. डी. (गणित) केले. सध्या अमेरिकेतल्या एका कंप्यूटर कंपनीत मॅनेजर आहेत. पती ज्ञानेंद्रकुमार नटवरलाल मयूर, ह्यूस्टन, अमेरिका.

* **श्रीहरी गणेश (८)** ज. स. १९४६. बी. टेक. (इले. इंजिनिअरिंग) परीक्षेत दुसरा क्रमांक. नंतर अमेरिकेत ह्यूस्टनमधील राइस युनिव्हर्सिटीमधून एम्. एस्. व पीएच्. डी. केले. सर्वोत्कृष्ट प्रबंधाबद्दलचे सुवर्णपदक मिळविले. सध्या पुण्याला एन्. आय्. बी. एम्. संस्थेत प्रोफेसर. प्रथम (घटस्फोटित) पत्नी ज्योत्स्ना, एम्. टेक्. पिता सहकारी, गोवा. कन्या चेतना, ज. स. १९७६. माध्यमिक विद्यार्थिनी. सध्याची पत्नी चंद्राणी, पिता मुखर्जी, कलकत्ता.

* **अनिल गणेश (८)** ज. स. १९४९. एस्. एस्. सी. परीक्षेत मराठीचे बक्षिस. नंतर १९७१ मध्ये बी. टेक. (एअरोनॉटिकल इंजिनिअरिंग) परीक्षेत दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण. नंतर अमेरिकेत कॅलटेकमधून एम्. एस्. आणि बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन डिप्लोमा. अमेरिकेत ऑईल कंपन्यांमध्ये नोकरी करीत असताना संशोधन करून सरकारी पेटंटस् घेतली. नंतर कुवेतमध्ये आणि स्कॉटलंडमध्ये एका तेल कंपनीत सीनिअर इंजिनिअर. सध्या अमेरिकेत न्यू ऑर्लीन्स येथे एका कंपनीत ऑइल ड्रिलिंग एक्सपर्ट आहेत.

**यशवंत रामचंद्र (६)** ज. श. १८०३. मृत. नाटळी - भिरोडे येथे शेती व भिक्षुकी करीत. अविवाहित.

**विष्णु रामचंद्र (६)** ज. श. १८२०. मृ. स. १९७०. खुडीपाट येथे शेती करीत. पत्नी लक्ष्मी, पिता गोविंद श्रीराम पाटणकर, जामसंडे. कन्या (१) कृष्णाबाई, पती विनायक अनंत तुळपुळे, आडेली (सिंधुदुर्ग), (२) येसूबाई, पती गजानन शिवराम ओगले, दहिबाव (सिंधुदुर्ग).

* **परशुराम विष्णु (७)** ज. स. १९३६. खुडी येथे शेती करतात. पत्नी लता, पिता शंकर दामोदर लेले, चिंदर (सिंधुदुर्ग).

**ाारायण हरि (५)** मृत्यु ८८ व्या वर्षी. सांगलीस लोण्याचा

व्यापार करीत. पत्नी लक्ष्मी, पिता गोडबोले, कुणकेश्वर. कन्या काशी, पती दामले, सांगली.

**गोविंद हरि** (५) ज. स. १८५६ व मृ. स. १९२५. सांगलीस प्राथमिक शिक्षण झाल्यावर तेथेच एका जमीनदाराकडे शेती - बागबगीचा करण्याची नोकरी धरली. यांच्या कतृत्वाने त्या जमीनदाराला बरेच उत्पन्न मिळू लागले व त्यांनीही यांच्या ठरलेल्या वेतनापेक्षा अधिक वेतन दिले. अशी अनुकूल स्थिती असता केवळ वडिलांच्या आग्रहास्तव घरी खुडीपाट येथे गेले व शेवटपर्यंत तेथेच शेती करून राहिले. अत्यंत व्यवहारचतुर होते. व्यवहारांत पुढे घडून येणाऱ्या गोष्टी लोकांना अगोदर सांगत असत व यांच्या सांगण्याप्रमाणे त्या अचूक घडून येत. आयुष्यात कोणाचे कर्ज काढावे लागले नाही. प्रकृति अत्यंत निकोप व वागणूक नियमित आणि निस्पृह. पिशाच्चयोनीवर यांचा विश्वास होता. यांनी आपला अंतकाळ आप्तेष्टांना कळविला होता. पत्नी रमा, पिता भास्कर विठ्ठल नातू, चिंदर.

**रावजी गोविंद** (६) ज. स. १८८९, मृ. स. १९५९. मुंबईस पेढीवर कारकून होते. पहिली पत्नी अन्नपूर्णा, पिता नारायण बाळंभट खरे, नेरूर. पुत्र मोरेश्वर, कन्या (१) चंद्री, पती परशुराम विष्णु लेले, मुटाट. (२) द्वारकी, पती रघुनाथ मोरेश्वर आपटे, अणसुरे. दुसरी पत्नी अन्नपूर्णा, पिता बाळाजी अनंत सोहनी, हिंदळे. पुत्र गजानन, गोविंद व वसंत. कन्या कमळा, पती भालचंद्र शंभुराव दातार, धुळे.

**मोरेश्वर रावजी** (७) ज. स. १९२०, मृ. स. १९४३. मुंबईस इंजिनिअरिंग कंपनीत कारकून होते.

* **गजानन रावजी** (७) ज. स. १९३१. बी. ए., मुंबईला सेंट्रल एक्साइज खात्यात सुपरीटेंडेंट. वास्तव्य डोंबिवली. पत्नी मंगला, एस्. एस्. सी., पिता श्रीकृष्ण वामन जोशी, रत्नागिरी.
* **हेमंत गजानन** (८) ज. स. १९६३. बी. कॉम. मुंबईत ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्समध्ये नोकरी.

* **राजेंद्र गजानन** (८) ज. स. १९६५.डी. एम्. ई. (मेक.)

* **गोविंद रावजी** (७) ज. स. १९३४. बी. ए., वायुसेना दलाचा डिप्लोमा इन इन्स्ट्रुमेंटेशन. एअर इंडियाच्या सांताक्रुझ येथील मेंटेनन्स खात्यात टेक्नीशिअन. वास्तव्य डोंबिवली. पत्नी सुनीता, मॅट्रिक, पिता बळवंत वामन जोशी, पुणे. कन्या शुभदा, कॉलेज विद्यार्थिनी.

कु.वृ.पृ. ११६ अखेर कु.वृ.पृ. ११७ सुरुवात

* **मनोज गोविंद** (८) ज. स. १९६७. प्रॉडक्शन. इंजिनिअरिंगचा विद्यार्थी.

* **वसंत रावजी** (७) ज. स. १९४२. एस्. एस्. सी., ड्राफ्ट्समन डिप्लोमा. पूर्वी निरनिराळ्या इलेक्ट्रिकल कंपन्यातून नोकरी. सध्या मेकॅनिकल ड्राईंग्ज बनविण्याचा स्वत:चा व्यवसाय. वास्तव्य डोंबिवली. अविवाहित.

**विश्वनाथ गोविंद** (६) ज. स. १८९४, मृ. स. १९५९. मुंबईस जी. आय्. पी. रेल्वेत वाडीबंदर येथे नोकरी. पहिली पत्नी गौरी, पिता शंकर बाळकृष्ण काळे, तुळस. पुत्र पांडुरंग. दुसरी पत्नी गौरी, पिता गणेश रामचंद्र तुळपुळे, त्रिंबक. कन्या (१) शांता, पती वामन रामचंद्र पटवर्धन, महाड. (२) सुंदरा, पती विनायक केशव जोशी, हिंदळे (सिंधुदुर्ग).

* **पांडुरंग विश्वनाथ** (७) ज. स. १९२२ मॅट्रिक. सेवानिवृत्त. वास्तव्य परळ, मुंबई. पत्नी विजया, पिता गोविंद सीताराम जोशी, दापोली. कन्या ज्योत्स्ना, एस्. एस्. सी., शिवण, ई. टी. सी. कोर्स. शिक्षिका, पती रत्नाकर नारायण केळकर, मुंबई.

* **विश्वनाथ पांडुरंग** (८) ज. स. १९६१, बी. एस्सी., बी. ए. मुंबईच्या हिंदुजा नॅशनल हॉस्पिटलमध्ये ई. ई. जी. टेक्नीशिअन.
* **नारायण विश्वनाथ** (७) ज. स. १९४२, एस्. एस्. सी., एन्. एफ्. सी., सी. पी. एड्. महाराष्ट्र सरकारच्या स्पोर्ट्स अँड यूथ खात्यातील शिक्षक (कोच) म्हणून अंजुमन खैरूल इस्लाम उर्दू हायस्कूल, मुंबई - ८, या शाळेमध्ये नियुक्त.

या शाळेमध्ये गेली २५ वर्षे क्रीडाशिक्षक असून ८० फुटबॉल व बास्केटबॉल खेळाडू विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यांना क्रीडा शिष्यवृत्त्या मिळवून दिल्या. पत्नी भाग्यश्री, एस्. एस्. सी., बी. पी. एन्. ए., पिता विष्णु कृष्ण काणे, खेड.

* **मंदार नारायण (८)** ज. स. १९७४. विद्यार्थी.

**विष्णु हरि (५)** मृत्यु ३० व्या वर्षी. बी. ए. स्कॉलर, सांगलीस खासगी शाळा चालविली. पत्नी सत्यभामा, पिता पाटणकर, सांगली.

**महादेव हरि (५)** ज. श. १७८८. मृ. स. १९५२. आचरे (मालवण) येथे खुडीपाट येथून गेले. तेथे श्वशुरांची सर्व इस्टेट वारसाहक्काने यांस मिळाली. पत्नी रखमा, पिता सदाशिव बल्लाळ देवधर, आचरे. कन्या (१) दुर्गा, पती भास्कर रामचंद्र पटवर्धन, सांगली. (२) तारा, पती परशुराम सखाराम देवधर - दीक्षित, मुटाट. (३) भागू, पती केशव गंगाधर भट, बांदिवडे.

**बाळकृष्ण महादेव (६)** ज. स. १८८९, मृ. स. १९४२. मुंबईस बी. बी. सी. आय्. रेल्वेच्या गुड्स ऑफिसात कर्नाकबंदर येथे कारकून होते. पत्नी सत्यभामा, पिता आप्पाजी नारायण दिवेकर, आचरे. कन्या काशी, एस्. एस्. सी., एस्. टी. सी., रा. भा. पंडित, शिक्षिका, पती केशव नारायण खरे, पनवेल.

**सदाशिव महादेव (६)** ज. स. १८९३, मृ. स. १९३०. आचरे येथे वडिलांच्या बरोबर घरचा व्यवहार पहात. पत्नी पार्वती, पिता आत्माराम विनायक डोंगरे, वडाचा पाट.

* **गणेश सदाशिव (७)** ज. स. १९३०. आचरे (सिंधुदुर्ग) येथे शेती व घरगुती व्यवसाय. सरपटणाऱ्या प्राण्यांपासून इतरांना वाचविण्यासाठी जीव धोक्यात घालून मदत करतात. पत्नी सुमित्रा, पिता विठ्ठल बाळकृष्ण दामले, त्रिंबक (सिंधुदुर्ग). कन्या (१) लीला, एस्. एस्. सी., पती सुरेश गोविंद मेहेंदळे, मसुरे (सिंधुदुर्ग) (२) वृंदा, एस्. एस्. सी., पती भारत पुरुषोत्तम बापट, नारिंग्रे (सिंधुदुर्ग).

* **संजय गणेश (८)** ज. स. १९६९. विद्यार्थी अभ्यासात हुशार. शिष्यवृत्तीचा मानकरी.

**रघुनाथ महादेव (६)** ज. स. १८९८. मृ. स. १९६४. प्रथम मुंबईस खासगी नोकरी केली. नंतर कमिशन एजंट. पत्नी जानकी, पिता वामन कृष्ण तुळपुळे, आडवली.

**गोपाळ हरि (५)** ज. स. १८६९. मृ. स. १९२३. मॅट्रिक. मद्रास येथे एम्. एस्. एम्. रेल्वेच्या ऑडिट ऑफिसात हेड क्लार्क होते. पहिली पत्नी सीता, पिता महादेव बळवंत अभ्यंकर, सांगली. पुत्र शंकर, दुसरी पत्नी सीता, पिता नारायण हरि जोशी, पुणे. पुत्र रामचंद्र. कन्या (१) द्वारका, पती वामन चिंतामण करमरकर, भिलवडी. (२) मथू, पती काशीनाथ दत्तात्रेय भावे, भिलवडी.

**शंकर गोपाळ (६)** ज. स. १९००. मृ. स. १९५८. बी. ए. पुण्यास नूतन मराठी विद्यालयांत चार वर्षे शिक्षक. १९२८ पासून जी. आय्. पी. रेल्वेंत स्टॉक व्हेरिफायर. वेदशास्त्रोत्तेजक सभेचे आजीव सभासद. वास्तव्य पुणे. पत्नी उमा, पिता धोंडो वासुदेव जोगळेकर, पुणे. कन्या. (१) शांता, इंटर आर्टस्, पती शंभो हरी पटवर्धन. (२) कमल, पती विश्वनाथ सदाशिव तुळपुळे. (३) तारा, पती केशव गंगाधर अभ्यंकर.

कु.वृ.पृ. ११७ अखेर कु.वृ.पृ. ११८ सुरुवात
**(वंशावळ पृ. १११)**

* **चंद्रशेखर शंकर (७)** ज. स. १९३४, डिप्लोमा इन इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी. पुणे येथे सरकारी नोकरी. इलेक्ट्रिकल मेंटेनन्समध्ये विशेष प्राविण्य. पत्नी अनुराधा, पिता अनंत विष्णु गोखले.

* **श्रीधर चंद्रशेखर (८)** ज. स. १९६७. वाणीज्य शाखेचा

कॉलेज विद्यार्थी.

* **केदार चंद्रशेखर (८)** ज. स. १९७०. विद्यार्थी.

* **माधव शंकर (७)** ज. स. १९३९. बी. ई. (सिव्हिल)., डी. सी. टी., पीएच्. डी. (इंग्लंड), स्ट्रक्चरल इंजीनिअर व आर्. सी. सी. कन्सलटंट. वास्तव्य ठाणे. पत्नी नंदिनी, पिता डॉ. प्रभाकर दत्तात्रय भावे, पुणे. कन्या (१) सरिता, माध्यमिक विद्यार्थिनी. (२) रोहिणी, प्राथमिक विद्यार्थिनी.

* **रामचंद्र गोपाळ (६)** ज. स. १९०८. एम्. ए. सांगलीस विलिंग्डन कॉलेजात अर्धमागधी व संस्कृत या विषयांचे प्राध्यापक. सांगली एज्युकेशन सोसायटीचे कौन्सिलर. युनिव्हर्सिटीच्या बी. ए. चे परीक्षक. आता निवृत्त. वास्तव्य सांगली. कॉलेज विद्यार्थी असताना क्रीडापटु, टेनिस चँपियन. प्रथम पत्नी सरला, इंटर (म्हैसूर), पिता कृष्णाजी दामोदर जोशी, बंगलोर. दुसरी पत्नी यमू, महिला मंडळामध्ये सहभाग, पिता रामचंद्र धोंडो गाडगीळ, मनमाड. कन्या उषा बी. ए. प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण, पती विजय विश्वनाथ जोगळेकर, पुणे.

**सुरेश रामचंद्र (७)** ज. स. १९३७. मृ. स. १९८२. बी. ई., बी. ए., बी. कॉम. महाराष्ट्र सरकारात डेप्युटी इंजिनिअर होते. पत्नी शैलजा, पिता रामचंद्र धोंडो गाडगीळ.

* **संजय सुरेश (८)** ज. स. १९५९. एम्. टेक्. (कंट्रोल अँड इन्स्टुमेंटेशन) पुण्याला फिलिप्स कंपनीत नोकरी. पत्नी अमृता, बी. ए., पिता कृष्णाजी चिंतामण वझे, मुंबई. कन्या मधुरा, ज. स. १९८७.

* **सुनिल सुरेश (८)** ज. स. १९६१. एम्. ई., पुण्याला किर्लोस्कर ऑइल एंजिन्समध्ये नोकरी.

* **सुभाष सुरेश (८)** ज. स. १९६४. बी. ई. करीत आहे.

* **रमेश रामचंद्र (७)** ज. स. १९३८, बी. ई. (इले.), एम्. ई. (इले.), बी. ए., बी. कॉम्. प्रथम मुंबईमध्ये निरनिराळ्या कंपन्यात नोकरी. १९६३ पासून सांगलीच्या वालचंद इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये सहाय्यक लेक्चरर नंतर लेक्चरर व १९८५ पासून प्रोफेसर. आता खाते प्रमुख. क्वाड्रुपोल मॅग्नेटस्, शैक्षणिक विद्युत उपकरणांचे डिझाइन्. थ्री फेज इंडक्शन मोटर्स अशा संशोधनपर प्रकल्पांवर काम केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे स्वीकृत सभासद. बोर्ड ऑफ युनिव्हर्सिटी टीचिंग अँड रिसर्चचे इलेक्ट्रिकल मशीन्सचे सदस्य. इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनिअर्स (इंडिया) या संस्थेच्या इंजिनिअरिंग कॉलेज स्टुडंट्स् चॅप्टरचे सल्लागार. तांत्रिक व शास्त्रीय विषयांवर लेखन व चर्चासत्रांमध्ये सहभाग. अभियांत्रिकी व वैद्यकीय संशोधनाची आवड. गुलाबचंद रिसर्च फौंडेशनचे प्रमुख व कार्यवाह. पत्नी मीना, बी.ए. (ऑ.) पिता अनंत गुंडो पटवर्धन, जमखिंडी. कन्या जयश्री, इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स डिप्लोमा (प्रथम श्रेणी), कंप्यूटर प्रोग्रॅमिंग कोर्स उत्तीर्ण, मुंबई दूरदर्शन केंद्रात इंजिनिअरिंग ऑसिस्टंट. पती गणेश माधव अभ्यंकर, डोंबिवली.

* **गिरीश रमेश (८)** ज. स. १९६९, बी. ई. (इले.) चे शिक्षण घेत आहे.

* **दिनेश रामचंद्र (७)** ज. स. १९४४, बी. ई. (सिव्हिल) कोल्हापूर येथे महाराष्ट्र सरकारच्या नगर रचना विभागात इंजिनिअर. पत्नी अंजली, मॅट्रिक, शिवणकामात प्राविण्य, पिता कृष्णाजी विठ्ठल केळकर, कासाखेली (रत्नागिरी). कन्या अपर्णा, ज. स. १९७६, विद्यार्थिनी.

* **समीर दिनेश (८)** ज. स. १९७३, विद्यार्थी.

१२०

* **प्रकाश रामचंद्र (७)** ज. स. १९५१, बी. टेक्. (केमि.) (मुंबई). १९६७ मध्ये एस्. एस्. सी. परीक्षेत बोर्डात आठवा क्रमांक. इंटर सायन्स परीक्षेत प्रथम क्रमांक. प्रथम पुणे येथे

फील्ट्रॉन इंजिनिअरिंगमध्ये नोकरी. सध्या खाजगी क्लासेस चालवितात. पत्नी आरती, बी. ए. खाजगी नोकरी, पिता सीताराम नारायण जगदाळे, पुणे.

* **नीरज प्रकाश (८)** ज. स. १९८०.

* **कमलेश रामचंद्र (७)** ज. स. १९५४, बी. एस्सी., डी. बी. एम्., सी. ए. आय. आय्. बी., हातकणंगले (कोल्हापूर) येथील स्टेट बँकेच्या शाखेत अधिकारी. पत्नी गीता, बी. ए., पिता वामनराव जोगळेकर.

कु.वृ.पृ. ११८ अखेर कु.वृ.पृ. ११९ सुरुवात
(वंशावळ पृ. ११२)

* **राजेश कमलेश (८)** ज. स. १९८१. विद्यार्थी.

* **निलेश कमलेश (८)** ज. स. १९८३. विद्यार्थी.

**सदाशिव बाबजी (४)** मृत्यु ५८ व्या वर्षी. खुडीपाट येथे शेती करीत. पत्नी पार्वती, पिता विष्णुपंत देवधर, आचरें. कन्या (१) लाडुबाई, पती जनार्दन कृष्ण गोगटे, वकील, देवगड. (२) भागू, पती भास्कर भटजी नातू, मसुरे. (३) सखू, पती सदाशिवराव पटवर्धन, हिंदळे.

**अनंत सदाशिव (५)** मृ. स. १९०९, वय ४५. खुडीपाट येथून रेवदंडा येथे गेले. तेथील दातार सावकारांकडे नोकरी केली. हबसाणांत मिठाखार गांवी राहात. पत्नी गंगा - धोंडूबाई, पिता अनंत कृष्ण गोगटे, चिंदर. कन्या (१) चंद्री, पती श्रीधर गणेश बर्वे, चौल. (२) मथुरा, पती सदाशिवराव बर्वे. चौल.

**सदाशिव अनंत (६)** मृ. स. १९११. वय ३५. रेवदंडा येथे खाजगी नोकरी. पुढे शिवणकामाचे व चहाचे दुकान होते. पत्नी मनू, पिता गंगाधरपंत गोखले, रेवदंडा. कन्या दुर्गा, पती गांगल, महाड.

**लक्ष्मण अनंत (६)** ज. स. १८९८. पनवेल तालुक्यांत खोपटे गांवी शिक्षक. पत्नी पार्वती, पिता रामचंद्र गणेश फडके, पेण. पुढील माहिती मिळाली नाही.

**विनायक लक्ष्मण (७)** ज. स. १९२६. पुढील माहिती मिळाली नाही.

**दत्तात्रेय लक्ष्मण (७)** ज. स. १९२८. मृ. स. १९८७. मॅट्रिक. मुंबईस अबकारी खात्यात नोकरी होती. ठाणे येथे वास्तव्य. जागा सोडण्याच्या प्रश्नावरून यांचा १३-२-८७ रोजी ठाणे येथे खून करण्यात आला. यांना वारस नसल्याने न्यायालयाने यांची स्वकष्टार्जित मालमत्ता यांचे निकटवर्ती श्री. कर्वे यांजकडे सुपूर्द केली. श्री. कर्वे यांनी एकूण रक्कम रु. ३,९१,२०० प्रामाणिकपणे सार्वजनिक संस्थांना देणगीदाखल वाटून दिली. पैकी ठाण्याच्या ब्राह्मण शिक्षण मंडळाच्या प्राथमिक शाळेला रु. २,३५,०००, कळवा येथील जवाहर वाचनालयाला रु. ७५,०००, नागावच्या हायस्कूलला रु. ५१,००० या प्रमुख संस्था होत. अविवाहित होते.

**केशव सदाशिव (५)** ज. श. १७८९. मृ. स. १८६५. खुडीपाट येथे शेती करीत. पत्नी यमुना, पिता प्रभाकर त्र्यंबक सिद्धये, हिंदळे. कन्या (१) साळू, पती नारायण महादेव कोझरेकर - केळकर, आंबेरी. (२) वाराणशी, पती परशुराम गणेश मेहेंदळे, वाई. (३) योगेश्वरी, पती वामन कृष्ण मेहेंदळे, वाई. (४) बनू, पती विष्णु रावजी डोंगरे, वडाचा पाट. (५) वेणू, पती शंकर नारायण आपटे, देवाचे गोठणे.

**श्रीराम केशव (६)** ज. श. १८२३. मृ. स. १९५३. खुडीपाट येथे शेती करीत. पत्नी सीता, पिता रघुनाथ भिकाजी अभ्यंकर नारिंग्रे. कन्या (१) दुर्गा, पती शंकर कृष्ण मेहेंदळे, इळये. (२) गंगू, पती पुरुषोत्तम जगन्नाथ पाटणकर, दाभोळे (सिंधुदुर्ग). (३) रंगू, पती रामचंद्र जगन्नाथ फडके, जामसंडे (सिंधुदुर्ग) (४) लाडू, पती गजानन विठ्ठल बापट, मोंड (सिंधुदुर्ग).

**जनार्दन श्रीराम (७)** ज. श. १८४८. मृत. अविवाहित.

* **पुरुषोत्तम श्रीराम (७)** ज. स. १९३०. एस्. एस्. सी., सीनिअर ट्रेण्ड प्राथमिक शिक्षक. सेवानिवृत्त. वास्तव्य

दहिबाव (सिंधुदुर्ग). पत्नी सुशीला, पिता वासुदेव रघुनाथ गणपुले, सावंतवाडी. कन्या मंगल, एस्. एस्. सी., पती गजानन वासुदेव काळे, गोवळ (रत्नागिरी).

* **शरद पुरुषोत्तम (८)** ज. स. १९६४. १२ वी व टर्नर कोर्स पूर्ण.

* **प्रदीप पुरुषोत्तम (८)** ज. स. १९६९. एस्. एस्. सी., आय्. टी. आय्. शिक्षण चालू.

* **मधुकर श्रीराम (७)** ज. स. १९३७. एस्. एस्. सी. वालचंदनगर (पुणे) येथील वालचंदनगर इंडस्ट्रीज लि. मध्ये सुपरवायझर. पत्नी निर्मला, एस्. एस्. सी., पिता विष्णु बाळाजी बापट, आचरे (सिंधुदुर्ग). कन्या संध्या कॉलेज विद्यार्थिनी.

* **संतोष मधुकर (८)** ज. स. १९६४. बी. कॉम. चा विद्यार्थी.

* **गोपाळ श्रीराम (७)** ज. स. १९४१. खुडीपाट येथे शेती. ग्रामपंचायत सदस्य. पत्नी जयश्री, एस्. एस्. सी., पिता विश्वनाथ वासुदेव चिपळूणकर, बांदिवडे (सिंधुदुर्ग).

* **रमेश गोपाळ (८)** ज. स. १९७२. विद्यार्थी.
* **संजय गोपाळ (८)** ज. स. १९७४. विद्यार्थी.
* **विजय गोपाळ (८)** ज. स. १९७६. विद्यार्थी.

**कु.वृ.पृ. ११९ अखेर कु.वृ.पृ. १२० सुरुवात**
**(वंशावळ पृ. ११२ - ११३)**

**वासुदेव सदाशिव (५)** दुसरे नाव मामा ज. श. १७९०. सांगली हायस्कुलांत मॅट्रिकपर्यंत शिक्षण झाले. सन १८९३ पासून देवगड येथील खाजगी इंग्रजी शाळेत शिक्षक. १९२३ पर्यंत तेथे काम केले. वासुदेवराव मामा व त्यांचे भाचे गोगटे या उभयतांनी अविश्रांत परिश्रम करून शाळेची संस्था ऊर्जित दशेस आणिली. वासुदेवरावांना पशुसंवर्धनाची अत्यंत आवड असल्यामुळे खुडीपाट येथे गाई, बैल, म्हशी इत्यादी जनावरे बाळगून त्यांचे संगोपन केले. भाचे गोगटे यांचे घरी बळकूवाडी येथे सुखवस्तु राहात. पत्नी सावित्री, पिता सदाशिव बाबूराव बापट, नारिंग्रे.

**अंताजी हरि (३)** हिंदळे येथे शेती करीत. पत्नी यशोदा. कन्या ६ होत्या. एक कन्या बागमळा येथील गद्रे घराण्यांत आणि दुसरी हिंदळे येथील बापट घराण्यात दिली.

**शिवराम अनंत (४)** मृ. ७७ व्या वर्षी. वैदिक. हिंदळे येथे शेती व भिक्षुकी करीत. पत्नी गौरी, पिता रामाजीपंत खाडिलकर, नारिंग्रे. कन्या (१) सखू, पती वासुदेव बल्लाळ सोमण, मिठबाव. (२) चिमा, पती महादेव बल्लाळ अभ्यंकर, मसुरे.

**प्रभाकर (भलंभट) शिवराम (५)** मृ. श. १८४४. वय ७७. हिंदळे येथे शेती व भिक्षुकी करीत. पत्नी यशोदा, पिता यशवंत बल्लाळ बापट, नारिंग्रे. कन्या तारा, पती दिनकर मोरेश्वर पटवर्धन, हिंदळे.

**अनंत प्रभाकर (६)** ज. श. १८०७. मृ. स. १९५७. मुंबईस भिक्षुकी करीत. पहिली पत्नी गौरी, पिता धोंडभटजी काणे, मालवण. हिला अपत्य नाही. दुसरी पत्नी अन्नपूर्णा, पिता सदाशिव जनार्दन भिडे, इळये. कन्या (१) लाडूबाई, पती जगन्नाथ अनंत मेहेंदळे, हिंदळे. (२) अंबू, पती गोविंद हरि केळकर, बडोदे. (३) तारा, पती शिवराम भालचंद्र जोशी, कल्याण.

**शिवराम अनंत (७)** ज. स. १९१८. मृ. स. १९७४. १२१अ

मुंबईला भिक्षुकी करीत. पत्नी रमा, पिता गणेश वासुदेव नातू, आचरे (सिंधुदुर्ग). कन्या (१) शांता, नोकरी, पती सुरेश पाध्ये, ठाणे. (२) मालती, नोकरी, पती विजय श्रीधर देवधर, मुंबई. (३) सुधा, नोकरी, पती अशोक शंकर दाते, धाऊलवल्ली रत्नागिरी. (४) प्रभा, पती प्रकाश पाटील,

मुंबई. (५) कुंदा, नोकरी. (६) वासंती, हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेतून एस्. एस्. सी. नंतर नोकरी. (७) शुभदा, हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेतून एस्. एस्. सी. झाली, बी. ए. चे शिक्षण घेत आहे.

* **उदय शिवराम (८)** ज. स. १९७०. विद्यार्थी.

**लक्ष्मण अनंत (७)** ज. स. १९२२. मृ. स. १९४२. अविवाहित.

* **गणेश अनंत (७)** ज.स. १९३१. एस्. एस्. सी. प्रथम मुंबईतील रॅमनॉर्ड रिसर्च लॅबोरेटरीमध्ये नोकरी. १९७७ पासून मुंबईच्या नवरंग सिने सेंटर मध्ये सुपरवायझर (कलकंसल्टंट) म्हणून काम करतात. फोटोग्राफीची आवड. पत्नी उषा, पिता श्रीकृष्ण वामन गोखले, ताम्हनमळा (रत्नागिरी).

* **अरविंद गणेश (८)** ज. स. १९६३. कॉलेज विद्यार्थी

* **सुरेश गणेश (८)** ज. स. १९६५. एस्. एस्. सी.
* **शरद गणेश (८)** ज. स. १९६९. कॉलेज विद्यार्थी

**हरि प्रभाकर (६)** ज. स. १८८९. मृ. स. १९६३. जी. आय्. पी. रेल्वेत मुंबईस वाडीबंदर येथे स्टोअर क्लार्क होते. १९४४ मध्ये सेवानिवृत्त. वास्तव्य मुंबई. पत्नी लक्ष्मी, पिता बाबा जोशी, इळये. कन्या इंदू, पती गोविंद वामन नामजोशी, बुरंबाड.

* **दामोदर हरि (७)** ज. स. १९२२. मॅट्रिक, एल्. एस्. जी. डी. (डिस्टिंक्शन), राष्ट्रभाषा रत्न, मराठी साहित्य विशारद. मुंबई महानगर पालिकेच्या आरोग्या विभागातून कार्यालयीन अधीक्षक पदावरून सेवानिवृत्त. १९४२ च्या राष्ट्रीय चळवळीतल्या सहभागापुढे स्थानबद्ध व सहा महिने कारावास. स्थानिक सार्वजनिक कार्यक्रमातून समाजकार्य. विद्यार्थ्यांना अभ्यासात मार्गदर्शन. वास्तव्य वडाळा. मुंबई, पत्नी कृष्णा (मंदाकिनी), पिता वामन भार्गव जोशी, ठाणे.

* **प्रभाकर दामोदर (८)** ज. स. १९५३. चार्टर्ड अकौंटंट. मुंबईत स्वत:चा व्यवसाय. योग शिक्षक. पत्नी सुमेधा, एम्. ए. पीएच्. डी. पिता केशव वामन भातखंडे, कल्याण.

* **निरंजन प्रभाकर (९)** ज. स. १९८२. प्राथमिक विद्यार्थी.

**श्रीधर प्रभाकर (६)** ज. श. १८१३. मृ. स. १९६४. कालिकत येथे गोरे यांचे पेढीवर कारकून होते. सेवानिवृत्त होऊन सोलापुरास राहात. पत्नी नर्मदा, पिता दिवाकर आप्पाजी खाडिलकर, मसुरे. कन्या कृष्णाबाई, पती गजानन श्रीपाद भावे, इंदूर.

* **जगन्नाथ श्रीधर (७)** ज. स. १९२०. एस्. एस्. सी., फर्स्ट क्लास बॉयलर प्रोफीशिअन्सी परीक्षा उत्तीर्ण. २२ वर्षे कापड गिरणीत करून चीफ इंजिनिअर पदावरून सेवानिवृत्त. सध्या उर्जा बचतीच्या विषयाचे सल्लागार. मशीनरी ले-आऊट व उभारणीचे विशेषज्ञ. वास्तव्य पुणे. पत्नी शालिनी, पिता विष्णु श्रीधर जोशी. कल्याण.

कु.वृ.पृ. १२० अखेर कु.वृ.पृ. १२१ सुरुवात
(वंशावळ पृ. ११३)

**मोरेश्वर श्रीधर (७)** ज. श. १८४५, मृ. स. १९८३. सरकारी पॉवरलूम स्कीममध्ये टेक्निकल असिस्टंट होते. पत्नी नलिनी, पिता सोहनी, सोलापूर.

* **विष्णु श्रीधर (७)** ज. स. १९३०. एल्. एम्. ई., एल्. एल्. ई. एच्. एन्. सी. (इंग्लंड). प्रथम मुंबईत प्रीमिअर ऑटोमोबाइल्स व वर्मा शेल कं. मध्ये नोकरी. नंतर भोपाळ येथे भारत हेवी इलेक्ट्रिकल्स कंपनीत नोकरी. या कंपनीने यांना ३ वर्षाच्या प्रशिक्षणासाठी इंग्लंडला पाठविले होते. क्रीडा व नाट्यक्षेत्रात रुची. निवृत्त होऊन सध्या वास्तव पुणे. पत्नी नंदिनी, एम्. ए., पिता पुरुषोत्तम बापट, अमरावती. कन्या पुष्पा, बी. एस्सी., बँकेत नोकरी. खेळात प्राविण्य, पती

हेमंत काळे, भोपाळ.

* **माधव विष्णु (८)** ज. स. १९६६. मद्रास येथील आय्. आय्. टी. मधून बी. टेक. (कंप्यूटर इंजि.) उत्तीर्ण. पीएच्. डी. साठी अमेरिकेला गेले आहेत. बॅडमिंटन खेळात प्रवीण. शालांत परीक्षेमध्ये गुणवत्ता यादीत. नॅशनल टॅलेंट स्कॉलर.

**विठ्ठल श्रीधर (७)** ज. श. १८५३. मृ. स. १९८८. स्थिर पत्ता नसे. अविवाहित होते.

* **सदाशिव श्रीधर (७)** ज. स. १९३४. एम्. कॉम्., जेनसन अँड निकलसन कंपनीच्या पनवेल येथील कारखान्यात अकौंटंट. सेंट्रल एक्साईज विषयाचे तज्ज्ञ. पत्नी योगिनी, बी. ए., आयुर्विमा मंडळामध्ये नोकरी. पिता व्यंकटेश काशीनाथ फाटक, थळ (रायगड). कन्या (१) सुनीला, ज. स. १९६६, एम्. फार्म. कॅरम व बुद्धिबळ खेळात बक्षिसे. पती सचिन कृष्णाजी कुळकर्णी, जर्मनी. (२) अनीला, ज. स. १९७३. कॉमर्स कॉलेज विद्यार्थिनी. व्हॉलिबॉल खेळाची राज्यस्तरावरील खेळाडू.

* **गजानन श्रीधर (७)** ज. स. १९३६. अविवाहित.

**यशवंत प्रभाकर (६)** ज. श. १८१५. मृ. श. १८४३. तिसऱ्या वर्षाचे ट्रेंड. इचलकरंजी संस्थानांत उत्तुर गांवी ३ वर्षे मुख्य शिक्षक होते. या नोकरीचा राजीनामा दिला. पुढे कोचीन येथील गोरे यांचे पेढीवर कारकून राहिले. हिंदळे येथे नवज्वराने वारले. पत्नी जानकी, पिता पांडुरंग लक्ष्मण चिपळूणकर, कांदळगांव.

**लक्ष्मण अनंत (४)** मृत्यु ७५ व्या वर्षी. वडगाव - माधवपूर (कुरुंदवाड धाकटी पाती) येथे भिक्षुकी करीत. पत्नी भागीरथी, पिता बापट, हिंदळे. कन्या (१) तुळशी, पती दत्तोपंत बेहरे,शहापूर. (२) गोदावरी, पती माधवराव भट, बेळगांव. (३) गंगू, पती गुंडोपंत गोखले, बेळगांव.

**मोरेश्वर लक्ष्मण (५)** ज. स. १८९४. मृ. स. १९३६. मॅट्रिक. शहापूर कोर्टात कारकून. पत्नी रमा, पिता दादोबा आपटे, शहापूर. कन्या (१) विमल, पती धनश्याम नरसिंह जोशी, बेळगांव. (२) सुंदर, मॅट्रिक, पती यशवंत रामचंद्र आपटे, पुणे.

* **अच्युत मोरेश्वर (६)** ज. स. १९२७. मॅट्रिक. लिप्टन इंडिया लि. कंपनीच्या मुंबई शाखेमध्ये प्रतिनिधी होते. तिथून सेवानिवृत्त होऊन कोल्हापूरला राहातात. पत्नी आशा, पिता हरी रामचंद्र रानडे, आजरा, कन्या अलका, बी. ए. (ऑ.), प्राथमिक शिक्षिका, पती वासुदेव केशव अभ्यंकर, डोंबिवली.

* **सतीश अच्युत (७)** ज. स. १९५५. बी. एस्सी., एल्एल्. बी. कोल्हापूर येथे युको बँकेत नोकरी. पत्नी वृषाली, बी. कॉम्., पिता परशुराम शंकर काळे, बेळगांव, कन्या राधिका, ज. स. १९८६.

* **शंकर (मधुकर) मोरेश्वर (६)** ज. स. १९३२. एस्. एस्. सी. सेंट्रल एक्साईजच्या रत्नागिरी आस्थापनेमध्ये कार्यालय अधीक्षक. कुवीरबाव (रत्नागिरी) येथे घर बांधले आहे. पत्नी मालती, एस्. एस्. सी., पिता डॉ. गोविंद बाळाजी बापट, आचरे (सिंधुदुर्ग). कन्या माधुरी, ज. स. १९६९. डी. सी. ई., खाजगी नोकरी.

* **उदय (मोरेश्वर) शंकर (७)** ज. स. १९६१. एम. ए. (इतिहास), डी. सी. ई., रत्नागिरी येथे राज्य परिवहन महामंडळात सिव्हिल इंजिनिअर (ज्यु.) म्हणून नोकरी. पत्नी मानसी, पिता प्रल्हाद पुरुषोत्तम सोहनी, रत्नागिरी.

* **अमेय उदय (८)** ज. स. १९८७.

**अनंत मोरेश्वर (६)**ज.स.१९३५.मृ.स.१९७१. अविवाहित.